भारत सरकार

विधि, न्याय व कंपनीकार्य मंत्रालय

# चलचित्र अधिनियम, १९५२

(सन १९५२ चा अधिनियम क्रमांक ३७)

[दिनांक २१ एप्रिल, २००३ रोजी यथाविद्यमान]

# The Cinematograph Act, 1952

**(Act No. 37 of 1952)**

**[ As in force on the 21st April, 2003]**

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले
२००४

[ किंमत : रु. ६.०० ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक २१ एप्रिल, २००३ रोजी यथाविद्यमान असलेला दि सिनेमॅटोग्राफ ॲक्ट, १९५२ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र,** असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १२, अंक ३, दिनांक २ ऑक्टोबर, २००३ यात पृष्ठ १५० ते १६० मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक २ ऑक्टोबर २००३.

**सुभाष चंद्र जैन,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the The Cinematograph Act, 1952 as on the 21st April, 2003 contains the authoritative text of that Act in Marathi which was Published in *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 3, Vol. 12, dated 2nd October 2003 on pages 150 to 160.

This authoritative text was published under the authority of the President under Section 2, Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 2nd October 2003.

SUBHASH C. JAIN,
Secretary to the Government of India.

# चलचित्र अधिनियम, १९५२

## कलमांचा क्रम

कलमे

### भाग एक

### प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. व्याख्या.

२-क. जम्मू व काश्मीर राज्यात जो कायदा अंमलात नाही किंवा जो कृतिकारी अस्तित्वात नाही त्या संबंधीच्या निर्देशांचा अर्थ लावणे.

### भाग दोन

### सार्वजनिक प्रदर्शनासाठी फिल्मचे प्रमाणन

३. चित्रपट सेन्सॉर मंडळ.

४. चित्रपटांचे परीक्षण.

५. सल्लागार पॅनल.

५-क. फिल्मचे प्रमाणन.

५-ख. फिल्मला प्रमाणपत्र देण्यासाठी मार्गदर्शक तत्वे.

५-ग. अपिले.

५-घ. अपील न्यायाधिकरणाची घटना.

५-ङ प्रमाणपत्र निलंबित करणे व परत घेणे.

५-च. केंद्र सरकारच्या आदेशाचे पुनर्विलोकन.

६. केंद्र सरकारचे पुनरीक्षणाचे अधिकार.

६-क. प्रमाणित चित्रपटांच्या संबंधात वितरकांना व प्रदर्शकांना द्यावयाची माहिती व दस्तऐवज.

७. या भागाच्या उल्लंघनाबद्दल शास्ती.

७-क. जप्त करण्याचा अधिकार.

७-ख. मंडळाकडून अधिकारांचे प्रत्यायोजन.

७-ग. परीक्षणासाठी फिल्म प्रदर्शन करण्याचा निदेश देण्याचा अधिकार.

७-घ. रिक्त पदांमुळे कार्यवाही विधिअग्राह्य न ठरणे.

७-ङ. मंडळाचे व सल्लागार पॅनलचे सदस्य हे लोकसेवक असणे.

७-च. कायदेशीर कार्यवाहीस रोध.

८. नियम करण्याचा अधिकार.

९. सूट देण्याचा अधिकार.

### भाग तीन

### चलचित्राच्या प्रदर्शनाचे विनियमन

१०. चलचित्राच्या प्रदर्शनासाठी लायसन देणे.

११. लायसन देणारा प्राधिकारी.

१२. लायसन देणाऱ्या प्राधिकरणाच्या अधिकारांवरील निर्बंध.

१३. विवक्षित प्रकरणी चित्रपटांचे प्रदर्शन निलंबित करण्याचा केंद्र सरकारचा किंवा स्थानिक प्राधिकरणाचा अधिकार.

१४. या भागाच्या उल्लंघनाबद्दल शास्ती.

१५. लायसन रद्द करणे.

१६. नियम करण्याचा अधिकार.

१७. सूट देण्याचा अधिकार.

### भाग चार

### निरसन

१८. निरसन.

# चलचित्र अधिनियम, १९५२

**(१९५२ चा अधिनियम क्रमांक ३७)**

(२१ एप्रिल, २००३ रोजी यथाविद्यमान)

[२१ मार्च, १९५२]

**प्रदर्शनासाठी चलचित्रपटाचे प्रमाणन करण्याविषयी आणि चलचित्रांच्या प्रदर्शनांचे विनियमन करण्याविषयी उपबंध करण्याकरिता अधिनियम.**

संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

## भाग एक

### प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास, "चलचित्र अधिनियम, १९५२" असे म्हणावे. **संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**

(२) भाग एक, दोन व चार यांचा विस्तार [2][* * * संपूर्ण भारतभर आहे आणि भाग तीनचा विस्तार केवळ [3][संघराज्य क्षेत्रां] वर आहे.

(३) हा अधिनियम, केंद्र सरकार **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील, अशा दिनांकास [4]अमलात येईल :

[5][परंतु, भाग एक आणि भाग दोन हे, चलचित्र (विशोधन) अधिनियम, १९७३ (१९७३ चा २५) याच्या प्रारंभानंतर केंद्र सरकार **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशाच दिनांकास, जम्मू व काश्मीर राज्यात अंमलात येईल.]

२. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,— **व्याख्या.**

(क) "प्रौढ" म्हणजे, जिने वयाची अठरा वर्षे पूर्ण केली आहेत, अशी व्यक्ती ;

[6][(ख) "मंडळ" म्हणजे, केंद्र सरकारने कलम ३ खाली स्थापन केलेले चित्रपट प्रमाणन मंडळ ;]

[7][(खख) "प्रमाणपत्र" म्हणजे, मंडळाने कलम ५क अन्वये दिलेले प्रमाणपत्र ;]

(ग) "चलचित्र" यात, चलचित्रांचे किंवा चित्रमालिकांचे प्रदर्शन करण्यासाठी असलेल्या कोणत्याही उपकरणाचा समावेश होतो ;

(घ) इलाखा नगराच्या बाबतीत "जिल्हा दंडाधिकारी" म्हणजे, पोलीस आयुक्त ;

[8][(घघ) "फिल्म" म्हणजे, चलचित्रफिल्म ;]

---

१. उद्देश व कारणे यांचे निवेदन यासाठी **भारताचे राजपत्र** १९५१, भाग दोन, कलम २, इंग्रजी पृ. २२० पहावे.

हा अधिनियमाचा विस्तार दादरा व नगरहवेलीवर, १९६३ चा विनियम ६, कलम २ व अनुसूचीद्वारे गोवा, दमण व दीववर, १९६३ चा विनियम ११, कलम ३ व अनुसूचीद्वारे करण्यात आला आहे.

या अधिनियमाचे भाग एक व दोन हे जम्मू व काश्मीर राज्यात (१ मे, १९७४ रोजी व तेव्हापासून) अधिसूचना क्र. जी. एस. आर. १८३ (ई), दिनांक २३ एप्रिल, १९७४ अन्वये अंमलात येतील.

२. "जम्मू व काश्मीर ही राज्ये वगळून" हा मजकूर १९७३ चा अधिनियम क्रमांक २५, कलम २ अन्वये वगळण्यात आला.

३. १९५९ चा अधिनियम क्रमांक ३, कलम २ अन्वये हा मजकूर "भाग 'क' राज्या" या मजकुराऐवजी समाविष्ट करण्यात आला.

४. दिनांक २८ जुलै, १९५२, माहिती व प्रसारण मंत्रालयाची अधिसूचना क्र. एस. आर. ओ. १०६६, दिनांक १० जून, १९५२, **भारताचे राजपत्र**, भाग दोन, विभाग ३, इंग्रजी पृ. ९४५.

५. १९७३ चा अधिनियम क्रमांक २५, कलम २ द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

६. १९८१ चा अधिनियम क्रमांक ४९, कलम २ द्वारे मूळ खंड (ख) ऐवजी दाखल केला (१ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

७. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे समाविष्ट केला (१ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

८. १९५९ चा अधिनियम क्रमांक ३, कलम ३ द्वारे समाविष्ट केला.

(ङ) "जागा" यात, घर, इमारत, तंबू आणि समुद्रमार्गे, भूमार्गे किंवा हवाईमार्गे वापरले जाणारे वाहतुकीचे कोणतेही साधन यांचा समावेश होतो ;

(च) "विहित" म्हणजे, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित ;

[1][ (छ) "प्रादेशिक अधिकारी" म्हणजे, केंद्र सरकारने कलम ५ खाली नियुक्त केलेला प्रादेशिक अधिकारी व त्यात, अतिरिक्त प्रादेशिक अधिकारी व सहायक प्रादेशिक अधिकारी यांचा समावेश होतो ;

(ज) "न्यायाधिकरण" म्हणजे, कलम ५घ खाली स्थापन केलेले अपील न्यायाधिकरण.]

[1][जम्मू व काश्मीर राज्यात जो कायदा अंमलात नाही किंवा जी कृतिकारी अस्तित्वात नाही त्यासंबंधीच्या निर्देशांचा अर्थ लावणे.

२-क. या अधिनियमामध्ये, जम्मू व काश्मीर राज्यात अंमलात नसलेल्या ज्या कायद्याबाबत किंवा त्या राज्यात अस्तित्वात नसलेल्या ज्या कृतिकारीबाबत असलेला कोणताही निर्देश हा, त्या राज्याच्या संबंधात किंवा त्या राज्यात अंमलात असलेल्या तत्सम कायद्याबाबतचा किंवा अस्तित्वात असलेल्या कृतिकारी बाबतचा निर्देश असेल.]

## भाग दोन

### सार्वजनिक प्रदर्शनासाठी फिल्मचे प्रमाणन

[3][चित्रपट सेन्सॉर मंडळ.

३. (१) जाहीर प्रदर्शनासाठी फिल्म मंजूर करण्याच्या प्रयोजनार्थ, केंद्र सरकारला, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, [4][चित्रपट प्रमाणन मंडळ] नावाचे एक मंडळ घटित करता येईल ; हे मंडळ, अध्यक्ष आणि [5][बारांहून कमी नाहीत व पंचवीसहून अधिक नाहीत] एवढे, केंद्र सरकारने नियुक्त केलेले अन्य सदस्य, यांचे मिळून बनलेले असेल.

(२) मंडळाच्या अध्यक्षाला, केंद्र सरकार ठरवून देईल इतके वेतन व भत्ते मिळतील आणि अन्य सदस्यांना मंडळाच्या बैठकींना उपस्थित राहण्यासाठी विहित करण्यात येईल इतके भत्ते किंवा फी मिळेल.

(३) मंडळाच्या अन्य सदस्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.]

चित्रपटांचे परीक्षण.

४. (१) एखादा चित्रपट प्रदर्शित करू इच्छिणारी व्यक्ती विहित रीतीने मंडळाकडे, त्यासंबंधातील प्रमाणपत्रासाठी अर्ज करील आणि मंडळ विहित रीतीने त्या चित्रपटाचे परीक्षण केल्यावर किंवा चित्रपटाचे परीक्षण करवून घेतल्यावर,—

(एक) त्या फिल्मचे अनिर्बंध जाहीर प्रदर्शन करण्यासाठी मंजुरी देऊ शकेल : [6]* * *

[7][परंतु, फिल्ममधील एखादा भाग लक्षात घेता, मंडळाचे जर असे मत झाले की, बारा वर्षाखालील कोणत्याही बालकाला अशी फिल्म पाहण्याची परवानगी द्यावी की नाही, या प्रश्नाचा त्या बालकाच्या मातापित्यांनी किंवा पालकांनी विचार करावा, असा इशारा देणे आवश्यक आहे तर, मंडळाला, तशा अर्थाचे पृष्ठांकन करून त्या फिल्मचे अनिर्बंध जाहीर प्रदर्शन करण्यासाठी मंजुरी देता येईल ; किंवा ]

(दोन) त्या फिल्मचे फक्त प्रौढांसाठी जाहीर प्रदर्शन करण्यासाठी मंजुरी देऊ शकेल ; किंवा

[8][ (दोन-क) फिल्मचे स्वरूप, आशय व कथावस्तू लक्षात घेऊन, त्या फिल्मचे, एखाद्या व्यवसायातील व्यक्तींपुरते किंवा एखाद्या वर्गातील व्यक्तींपुरते मर्यादित जाहीर प्रदर्शन करण्यास मंजुरी देऊ शकेल ; किंवा].

---

१. १९८१ चा अधिनियम क्रमांक ४९, कलम २ द्वारे समाविष्ट केला (१ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).
२. १९७३ चा अधिनियम क्रमांक २५, कलम ३ अन्वये समाविष्ट केले.
३. १९५९ चा अधिनियम क्रमांक ३, कलम ४ द्वारे कलमे ३ ते ६ ऐवजी दाखल केले.
४. १९८१ चा अधिनियम क्रमांक ४९, कलम ३ अन्वये, "फिल्म सेन्सॉर मंडळ" या ऐवजी घातले (१ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).
५. वरील अधिनियमाच्या कलम ३ अन्वये, "नऊहून अधिक नाहीत" या मजकुराऐवजी घातले (१ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).
६. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे "किंवा" हा शब्द वगळण्यात आला (१ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).
७. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले (१ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).
८. वरील अधिनियमाच्या कलम ४ अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला (१ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

[1][ (तीन) पूर्ववर्ती खंडांपैकी कोणत्याही खंडानुसार त्या फिल्मला जाहीर प्रदर्शनासाठी मंजुरी देण्यापूर्वी, मंडळास आवश्यक वाटेल अशी काटछाट किंवा फेरबदल करण्याचे निदेश अर्जदाराला देऊ शकेल ; किंवा]

(चार) फिल्मला जाहीर प्रदर्शनासाठी मंजुरी देण्याचे नाकारू शकेल.

(२) अर्जदाराला या प्रकरणी आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्याखेरीज मंडळ, पोटकलम (१), [2][खंड (एक) चे परंतुक, खंड (दोन), खंड (दोन-क), खंड (तीन) किंवा खंड (चार) ] अन्वये कोणतीही कार्यवाही करणार नाही.

**सल्लागार पॅनल.**

५. (१) मंडळाला या अधिनियमाखालील आपली कर्तव्ये कार्यक्षमतेने पार पाडणे शक्य व्हावे म्हणून केंद्र सरकार, त्यास योग्य वाटेल अशा प्रादेशिक केंद्रावर सल्लागार पॅनलची स्थापना करील, त्यात, केंद्र सरकारला नेमणूक करण्यास योग्य वाटतील तितक्या, व केंद्र सरकारच्या मते, फिल्मचा जनतेवर होणारा परिणाम जाणून घेण्यास अर्ह असतील अशा, व्यक्तींचा समावेश असेल.

(२) प्रत्येक प्रादेशिक केंद्रावर, केंद्र सरकारला जितक्या प्रादेशिक अधिकाऱ्यांची नेमणूक करणे योग्य वाटेल तितके प्रादेशिक अधिकारी असतील आणि या बाबतीत केलेल्या नियमांमध्ये, फिल्मच्या परीक्षणासाठी प्रादेशिक अधिकाऱ्यांचा सहभाग घेण्याची तरतूद करता येईल.

(३) ज्या चित्रपटाबाबत प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज करण्यात आलेला असेल, अशा कोणत्याही फिल्मच्या संबंधात मंडळाला, विहित केले जाईल त्या रीतीने सल्लागार पॅनलशी विचारविनिमय करता येईल.

(४) फिल्मचे परीक्षण करून योग्य वाटतील अशा शिफारशी मंडळाला करणे हे, अशा प्रत्येक सल्लागार पॅनलचे, मग ते निकाय म्हणून कार्य करीत असो किंवा यासंदर्भात तयार केलेल्या नियमांमध्ये ज्याची तरतूद करण्यात येईल अशा समित्यांमध्ये कार्य करीत असो, कर्तव्य राहील.

(५) सल्लागार पॅनलच्या सदस्यांना कोणतेही वेतन मिळण्याचा हक्क नसेल परंतु त्यांना, विहित करण्यात येईल अशी फी किंवा भत्ते मिळतील.

**फिल्मचे प्रमाणन.**

५-क. [3][ (१) फिल्मचे परीक्षण केल्यानंतर किंवा त्याचे विहित रीतीने परीक्षण करण्यात आल्यावर जर मंडळाला,—

(क) ती फिल्म अनिर्बंध जाहीर प्रदर्शनासाठी योग्य आहे, किंवा, यथास्थिति, कलम ४, पोटकलम (१) चा खंड (एक) याच्या परंतुकात नमूद केलेल्या स्वरूपाच्या पृष्ठांकनासह अनिर्बंध जाहीर प्रदर्शनासाठी योग्य आहे, असे वाटले तर, मंडळ त्या फिल्मसंबंधात प्रमाणपत्रासाठी अर्ज करणाऱ्या व्यक्तीला "**यू**" प्रमाणपत्र, किंवा, यथस्थिति, "**यूए**" प्रमाणपत्र देईल ; किंवा

(ख) ती फिल्म अनिर्बंध जाहीर प्रदर्शनासाठी योग्य नाही परंतु, केवळ प्रौढांसाठी जाहीर प्रदर्शन करण्यास किंवा यथास्थिति, एखाद्या व्यवसायातील किंवा एखाद्या वर्गातील व्यक्तींपुरते जाहीर प्रदर्शन करण्यास योग्य आहे, असे वाटले तर, मंडळ त्या फिल्मबाबत प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज करणाऱ्या व्यक्तीला "ए" प्रमाणपत्र, किंवा यथस्थिति, "एस" प्रमाणपत्र देईल,

आणि त्या फिल्मवर विहित रीतीने असे चिन्हांकन करवून घेईल :

परंतु, प्रमाणपत्राचा अर्जदार कोणताही वितरक किंवा प्रदर्शक किंवा जिला फिल्मसंबंधी हक्क संक्रामित केले गेले आहेत, अशी इतर कोणतीही व्यक्ती, खंड (क) आणि खंड (ख) अन्वये ज्यासाठी प्रमाणपत्र दिले गेले आहे अशा फिल्ममधील कोणत्याही बाबीच्या संबंधात अश्लीलतेसंबंधीच्या कोणत्याही कायद्यान्वये शिक्षेस पात्र होणार नाही.]

(२) कोणत्याही फिल्मसंबंधात देण्यात आलेले प्रमाणपत्र किंवा प्रमाणपत्र देण्यास नकार देणारा आदेश हा, **भारताच्या राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येईल.

(३) या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या अन्य उपबंधांना अधीन राहून, मंडळाने या कलमान्वये दिलेले प्रमाणपत्र हे, दहा वर्षांच्या कालावधीकरिता, संपूर्ण भारतात विधिग्राह्य राहील.

---

१. १९८१ चा अधिनियम क्रमांक ४९, कलम ४ अन्वये हा खंड, मूळ खंड (तीन) ऐवजी दाखल करण्यात आला (१ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ४ अन्वये हा मजकूर "खंड (दोन), खंड (तीन) किंवा खंड (चार)" या ऐवजी दाखल करण्यात आला (१ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ५ अन्वये हे पोटकलम मूळ पोटकलमाऐवजी दाखल करण्यात आले (१ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

फिल्मला प्रमाणपत्र देण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे.

५-ख. (१) चित्रपटाला प्रमाणपत्र देण्यास सक्षम असणाऱ्या प्राधिकरणाच्या मते जर ती फिल्म किंवा त्यातील कोणताही भाग हा, [1][भारताचे सार्वभौमत्व व एकात्मता,] राज्याची सुरक्षा, विदेशी राज्यांशी मैत्रीपूर्ण संबंध, सार्वजनिक सुव्यवस्था, सभ्यता व नैतिकता यांस बाधा आणणारा, किंवा न्यायालयाची मानहानी वा अवमान करणारा किंवा कोणताही अपराध घडवण्यास चिथावणी देणारा असेल तर, त्या फिल्मला जाहीर प्रदर्शनासाठी प्रमाणित केले जाणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये अंतर्भूत असलेल्या उपबंधांना अधीन राहून, केंद्र सरकार, जाहीर प्रदर्शनासाठी फिल्मला मंजुरी देण्याकरिता या अधिनियमान्वये प्रमाणपत्र देण्यास सक्षम असणाऱ्या प्राधिकरणांना मार्गदर्शक ठरतील अशी तत्त्वे ठरवून देण्यासाठी, त्यास योग्य वाटतील असे निदेश देऊ शकेल.

अपिले.

[2][५-ग. (१) एखाद्या फिल्मच्या संबंधात प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेली जी कोणतीही व्यक्ती मंडळाच्या,—

(क) प्रमाणपत्र देण्यास नकार देणाऱ्या आदेशामुळे ; किंवा

(ख) केवळ "ए" प्रमाणपत्र देणाऱ्या आदेशामुळे ; किंवा

(ग) फक्त "एस" प्रमाणपत्र देणाऱ्या आदेशामुळे ; किंवा

(घ) फक्त "यूए" प्रमाणपत्र देणाऱ्या आदेशामुळे ; किंवा

(ङ) अर्जदाराला काही काटछाट किंवा फेरबदल करण्याचे निदेश देणाऱ्या आदेशामुळे ; व्यथित झालेली असेल, तिला अशा आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत न्यायाधिकरणाकडे अपील करता येईल :

परंतु, न्यायाधिकरणाची जर अशी खात्री पटली की, उपरोक्त तीस दिवसांच्या कालावधीत अपील दाखल करण्यास प्रतिबंध होण्यास अर्जदाराला पुरेसे कारण होते, तर ते, पुढील तीस दिवसांच्या मुदतीत असे अपील स्वीकृत करून घेण्यास परवानगी देईल.

(२) या कलमाखालील प्रत्येक अपील हे, लेखी विनंती अर्ज करून करण्यात येईल आणि त्यासोबत ज्याच्या विरुद्ध अपील करण्यात आलेले असेल अशा आदेशाच्या कारणांचे संक्षिप्त विवरण, जेव्हा ते विवरण अपिलकर्त्याला देण्यात आलेले असेल तेव्हा, दिले जाईल आणि विहित करण्यात येईल अशी, एक हजार रुपयांहून अधिक नसेल इतकी फी सुद्धा त्यासोबत दिली जाईल.

अपील न्यायाधिकरणाची घटना.

[3][५-घ. (१) मंडळाच्या कोणत्याही आदेशाविरुद्ध, कलम ५-ग खाली करण्यात आलेल्या अपिलांच्या सुनावणीच्या प्रयोजनार्थ, केंद्र सरकार, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे एक अपील न्यायाधिकरण घटित करील.

(२) या न्यायाधिकरणाचे मुख्यालय नवी दिल्ली येथे किंवा केंद्र सरकार **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा अन्य ठिकाणी असेल.

(३) अशा न्यायाधिकरणात एक अध्यक्ष आणि केंद्र सरकारने नियुक्त केलेले जास्तीत जास्त चार अन्य सदस्य असतील.

(४) एखादी व्यक्ती ही उच्च न्यायालयाची सेवानिवृत्त न्यायाधीश, किंवा उच्च न्यायालयाचा न्यायाधीश होण्यास अर्ह अशी व्यक्ती असल्याखेरीज ती, या न्यायाधिकरणाचा अध्यक्ष म्हणून नियुक्त होण्यास पात्र ठरणार नाही.

(५) केंद्र सरकारच्या मते ज्या व्यक्ती, फिल्मचा जनतेवर होणारा परिणाम जाणून घेण्यास पात्र असतील, अशा व्यक्तींना केंद्र सरकार न्यायाधिकरणाचे सदस्य म्हणून नियुक्त करू शकेल.

(६) न्यायाधिकरणाच्या अध्यक्षाला, केंद्र सरकार ठरवील असे वेतन व भत्ते मिळतील आणि सदस्यांना विहित करण्यात येतील असे भत्ते किंवा फी मिळेल.

(७) या संदर्भात करण्यात येतील अशा नियमांना अधीन राहून, केंद्र सरकार या अधिनियमाखालील न्यायाधिकरणाची कामे परिणामकारकपणे पार पाडण्यासाठी एका सचिवाची व त्यास आवश्यक वाटतील अशा अन्य कर्मचाऱ्यांची नियुक्ती करू शकेल.

---

१. १९८१ चा अधिनियम क्रमांक ४९, कलम ६ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (१ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ७ अन्वये मूळ कलम ५ग ऐवजी दाखल करण्यात आले (१ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ८ अन्वये समाविष्ट करण्यात आले (१ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

(८) न्यायाधिकरणाचा सचिव आणि त्याचे अन्य कर्मचारी हे, न्यायाधिकरणाच्या अध्यक्षाशी विचारविनिमय केल्यावर विहित करण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करतील व अशी कर्तव्ये पार पाडतील.

(९) न्यायाधिकरणाचा अध्यक्ष व सदस्य, आणि सचिव व अन्य कर्मचारी यांच्या सेवेच्या अटी व शर्ती विहित करण्यात येतील तशा असतील.

(१०) या अधिनियमाच्या उपबंधांना अधीन राहून, न्यायाधिकरण आपल्या स्वतःच्या कार्यपद्धतीचे विनियमन करू शकेल.

(११) न्यायाधिकरण, त्यास आवश्यक वाटेल अशी त्या प्रकरणाची चौकशी केल्यानंतर आणि अपीलकर्त्याला व मंडळाला त्या प्रकरणी आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, त्या फिल्म संबंधात त्यास योग्य वाटेल असा आदेश देईल आणि मंडळ, अशा आदेशाशी सुसंगत अशा रीतीने ते प्रकरण निकालात काढील.

**प्रमाणपत्र निलंबित करणे व परत घेणे.**

५-ङ. (१) कलम ६ च्या पोट-कलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, केंद्र सरकारला **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या भागान्वये मंजूर केलेले प्रमाणपत्र, त्यास योग्य वाटेल तेवढ्या कालावधीकरिता निलंबित करता येईल किंवा त्याची पुढील बाबतीत खात्री पटल्यास ते प्रमाणपत्र परत घेता येईल:—

(एक) ज्या फिल्मच्या बाबतीत ते प्रमाणपत्र दिलेले असेल, ती फिल्म ज्या स्वरूपात प्रदर्शित करण्यासाठी प्रमाणित करण्यात आली होती त्याहून अन्य स्वरूपात तिचे प्रदर्शन करण्यात येत होते ; किंवा

(दोन) ती फिल्म किंवा तिचा कोणताही भाग, या भागाच्या उपबंधांचे किंवा त्याखाली केलेल्या नियमांचे उल्लंघन करून प्रदर्शित करण्यात येत आहे.

(२) जेव्हा पोटकलम (१) अन्वये एखादी अधिसूचना प्रकाशित करण्यात आली असेल तेव्हा, केंद्र सरकार, प्रमाणपत्रासाठी अर्ज करणाऱ्या व्यक्तीला किंवा जिच्याकडे फिल्मचे अधिकार संक्रामित करण्यात आले असतील अशा अन्य व्यक्तीला किंवा दोघांनाही, त्या फिल्मच्या संबंधात मंजूर करण्यात आलेले प्रमाणपत्र आणि त्याच्या काही दुसऱ्या प्रती असल्यास, त्या सर्व दुसऱ्या प्रती, मंडळाकडे किंवा उक्त अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या अन्य एखाद्या व्यक्तीकडे किंवा प्राधिकरणाकडे पाठवण्यास भाग पाडू शकेल.

(३) संबंधित व्यक्तीला त्या प्रकरणी आपले मत मांडण्याची संधी दिल्याखेरीज या कलमान्वये कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही.

(४) या कलमान्वये ज्या कालावधीकरिता एखादे प्रमाणपत्र निलंबित ठेवलेले असेल, त्या कालावधीत ती फिल्म, अप्रमाणित फिल्म असल्याचे मानण्यात येईल.

**केंद्र सरकारच्या आदेशाचे पुनर्विलोकन.**

५-च. (१) जेव्हा, प्रमाणपत्रासाठी अर्ज करणारी व्यक्ती किंवा जिच्याकडे फिल्मचे अधिकार संक्रामित करण्यात आलेले असतील अशी अन्य व्यक्ती ही, केंद्र सरकारच्या, कलम ५-च खालील कोणत्याही आदेशामुळे व्यथित झाली असेल तेव्हा तिला, **शासकीय राजपत्रात** अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत केंद्र सरकारकडे, त्या आदेशाच्या पुनर्विलोकनासाठी अर्ज करता येईल व त्या अर्जात असे पुनर्विलोकन करण्याची आवश्यकता तिला का वाटते, ती कारणे नमूद करता येतील :

परंतु, प्रमाणपत्राच्या अर्जदारास किंवा त्या अन्य व्यक्तीस, उपरोक्त साठ दिवसांच्या कालावधीत पुनर्विलोकनासाठी अर्ज करण्यास प्रतिबंध होण्यास पुरेसे कारण होते, याबाबत केंद्र सरकारची खात्री पटल्यास, ते पुढील साठ दिवसांच्या मुदतीत असा अर्ज दाखल केला जाण्यास परवानगी देऊ शकेल.

(२) पोटकलम (१) खालील अर्ज मिळाल्यावर, केंद्र सरकार, व्यथित व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, आणि त्यास आवश्यक अशी आणखी चौकशी केल्यानंतर, आपला निर्णय कायम करण्याचा, त्यात फेरबदल करण्याचा किंवा तो फिरवण्याचा, त्यास योग्य वाटेल असा आदेश देऊ शकेल आणि मंडळ अशा आदेशास अनुसरून ते प्रकरण निकालात काढील.]

**केंद्र सरकारचे पुनरीक्षणाचे अधिकार.**

६. (१) या भागात काहीही अंतर्भूत असले तरीही, केंद्र सरकार, [1][स्वतःहून कोणत्याही टप्प्यावर] एखाद्या फिल्मसंबंधातील, मंडळासमोर प्रलंबित असलेल्या किंवा मंडळाने निकालात काढलेल्या कार्यवाहीच्या, [2][किंवा, यथास्थिति, न्यायाधिकरणाने निकालात काढलेल्या, कार्यवाहीच्या (परंतु यात न्यायाधिकरणासमोर प्रलंबित असलेल्या कोणत्याही कार्यवाहीचा अंतर्भाव नाही.)] अभिलेखाची मागणी करू शकेल आणि त्यास त्या प्रकरणी आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, त्यासंबंधात, त्यास योग्य वाटेल असा आदेश देऊ शकेल, आणि मंडळ अशा आदेशास अनुसरून ते प्रकरण निकालात काढील :

---

१. १९८१ चा अधिनियम क्रमांक ४९. याचे कलम ९ अन्वये "कोणत्याही टप्प्यावर" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (१ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ९ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (१ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

परंतु, प्रमाणपत्रांसाठी अर्ज करणाऱ्या व्यक्तीला किंवा यथास्थिति, जिला प्रमाणपत्र देण्यात आले आहे अशा व्यक्तीला बाधक ठरेल असा कोणताही आदेश, त्या बाबतीत आपले म्हणणे मांडण्याची संधी तिला दिल्यानंतरच काढण्यात येईल, एरवी नाही :

[१][परंतु आणखी असे की, या पोटकलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, केंद्र सरकारला सार्वजनिक हिताच्या दृष्टीने जी वस्तुस्थिती उघड करणे बाधक आहे असे त्यास वाटेल, ती वस्तुस्थिती उघड करण्यास भाग पाडले जाणार नाही.

(२) केंद्र सरकार, पोटकलम (१) अन्वये त्याला प्रदान केलेल्या अधिकारांना बाध न येता, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे पुढीलप्रमाणे निदेश देऊ शकेल:—

(क) ज्याला प्रमाणपत्र मंजूर करण्यात आलेले आहे असा एखादा चित्रपट संपूर्ण भारतात किंवा त्याच्या कोणत्याही भागात अप्रमाणित चित्रपट म्हणून मानण्यात यावा ; किंवा

(ख) ज्या चित्रपटाला "यू" प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे [२][किंवा "यूए" प्रमाणपत्र किंवा "एस" प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे] असा एखादा चित्रपट हा, त्यास "ए" प्रमाणपत्र मंजूर करण्यात आलेले आहे असा चित्रपट मानण्यात यावा ; किंवा

(ग) निदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल तेवढ्या कालावधीकरिता एखाद्या चित्रपटाचे प्रदर्शन निलंबित करण्यात यावे :

परंतु, खंड (ग) अन्वये देण्यात आलेला कोणताही निदेश हा, अधिसूचनेच्या दिनांकापासून दोन महिन्यांपेक्षा अधिक काळ अंमलात राहणार नाही.

(३) संबंधित व्यक्तीला त्या प्रकरणी आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्याखेरीज, पोट-कलम (२) चे खंड (क) किंवा खंड (ख) अन्वये कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही.

(४) पोटकलम (२) च्या खंड (क) अन्वये एखादा चित्रपट जेवढ्या कालावधीकरिता निलंबित राहील, तेवढ्या कालावधीपुरता तो चित्रपट अप्रमाणित असल्याचे मानण्यात येईल.]

[३][प्रमाणित चित्रपटांच्या संबंधात वितरकांना व प्रदर्शकांना द्यावयाची माहिती व दस्तऐवज.

६-क. जी व्यक्ती कोणताही प्रमाणित चित्रपट एखाद्या वितरकाकडे किंवा प्रदर्शकाकडे सोपवील, ती, विहित करण्यात येईल अशा रीतीने त्या चित्रपटाचे नाव, चित्रपटाची लांबी, त्या चित्रपटाच्या संबंधात दिलेल्या प्रमाणपत्राचा क्रमांक व स्वरूप आणि ते प्रमाणपत्र काही शर्तींच्या अधीन राहून देण्यात आलेले असल्यास, त्या शर्ती, व त्या चित्रपटाबाबतचा, विहित करण्यात येईल असा कोणताही तपशील, त्या माहिती वितरकाला, किंवा यथास्थिति, प्रदर्शकाला अधिसूचित करील.]

* * * *

या भागाच्या उल्लंघनाबद्दल शास्ती.

७. [४][(१) जर एखाद्या व्यक्तीने—

(क) कोणत्याही ठिकाणी,—

(एक) मंडळाद्वारे अनिर्बंधित सार्वजनिक प्रदर्शनासाठी किंवा प्रौढांसाठी [५][किंवा एखाद्या पेशातील व्यक्तींसाठी किंवा व्यक्तींच्या वर्गासाठी] निर्बंधित जाहीर प्रदर्शनास योग्य म्हणून प्रमाणित केला असेल अशा चित्रपटाखेरीज अन्य कोणतेही चित्रपट आणि ज्याच्या प्रदर्शनाच्या वेळी एक विहित मंडळाचे चिन्ह दिसून येते आणि असे चिन्ह लावल्यापासून त्यात कोणत्याही प्रकारे फेरबदल किंवा बिघाड केला नसेल असा चित्रपट प्रदर्शित केला असेल किंवा प्रदर्शित करण्याची परवानगी दिली असेल,

(दोन) फक्त प्रौढांसाठी जाहीर प्रदर्शन करण्याकरिता योग्य म्हणून मंडळाने प्रमाणित केलेला एखादा चित्रपट प्रौढ नसलेल्या एखाद्या व्यक्तीला प्रदर्शित केला किंवा प्रदर्शित करण्याची परवानगी दिली, [७] * * *

---

१. १९८१ चा अधिनियम क्रमांक ४९, कलम ९ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (१ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ९ अन्वये दाखल करण्यात आला (१ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

३. १९५३ चा अधिनियम क्रमांक १९, कलम ३ अन्वये दाखल करण्यात आले.

४. १९८४ चा अधिनियम क्रमांक ५६, कलम २ अन्वये कलम ६ख वगळण्यात आले (२७ ऑगस्ट, १९८४ रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाच्या कलम ४ अन्वये पूर्वीच्या पोटकलम (१) ऐवजी दाखल करण्यात आले.

६. १९८१ चा अधिनियम क्रमांक ४९, कलम ११ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (१ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

७. वरील अधिनियमाच्या कलम ११ अन्वये "किंवा" हा शब्द गाळण्यात आला.

[1][(दोन-क) एखाद्या पेशासाठी किंवा व्यक्तींच्या वर्गासाठी जाहीर प्रदर्शन करण्याकरिता योग्य म्हणून मंडळाने प्रमाणित केलेला एखादा चित्रपट, त्या पेशातील किंवा त्या वर्गातील व्यक्ती नसलेल्या एखाद्या व्यक्तीला प्रदर्शित केला किंवा प्रदर्शित करण्याची परवानगी दिली, किंवा]

(ख) कोणत्याही कायदेशीर प्राधिकाराविना (जो प्राधिकार सिद्ध करण्याची जबाबदारी त्या व्यक्तीवर राहील) एखाद्या चित्रपटात, तो प्रमाणित करण्यात आल्यानंतर, फेरबदल केला किंवा कोणत्याही प्रकारे त्या चित्रपटात बिघाड केला, किंवा

(ग) कलम ६-क मधील उपबंधाचे किंवा केंद्र सरकारने किंवा मंडळाने या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली केलेल्या नियमांद्वारे, त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांपैकी कोणत्याही अधिकाराचा वापर करताना, किंवा सोपवलेल्या कर्तव्यांपैकी कोणतेही कर्तव्य पार पाडताना दिलेल्या कोणत्याही आदेशाचे अनुपालन करण्यात कसूर केली,

[2][तर, त्या व्यक्तीस, तीन वर्षांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या कालावधीच्या कारावासाची, किंवा एक लाख रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या दंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होण्यास ती पात्र ठरेल, आणि तिचा अपराध चालू राहिल्यास, जेवढ्या कालावधीकरिता अपराध चालू राहील, त्या प्रत्येक दिवसास वीस हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या दंडाची आणखी शिक्षा होण्यास ती पात्र ठरेल :

परंतु, जी व्यक्ती, खंड (क) चा उप-खंड (एक) च्या उपबंधाचे उल्लंघन करून एखादी व्हिडिओ फिल्म कोणत्याही ठिकाणी प्रदर्शित करील किंवा प्रदर्शित करण्यास परवानगी देईल, ती व्यक्ती, तीन महिन्यांहून कमी नसेल, परंतु तीन वर्षांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या कालावधीच्या कारावासाची व वीस हजार रुपयांहून कमी नसेल, परंतु एक लाख रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या दंडाची शिक्षा होण्यास पात्र ठरेल, आणि ज्या प्रकरणी, अपराध घडणे चालू राहील त्याप्रकरणी, जेवढ्या कालावधीत अपराध घडणे चालू राहील, त्यातील प्रत्येक दिवसाकरिता वीस हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या दंडाची शिक्षा होण्यास पात्र ठरेल :

परंतु आणखी असे की, न्यायालय पुरेशा व विशेष कारणांसाठी तीन महिन्यांहून कमी कालावधीची कारावासाची शिक्षा, किंवा वीस हजार रुपयांहून कमी दंडाची शिक्षा लादू शकेल व त्याची कारणे न्यायनिर्णयात नमूद करण्यात येतील :]

[3][परंतु तसेच,] फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याच्या कलम २९ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही महानगर दंडाधिकाऱ्याने, किंवा राज्य शासनाने त्यासंदर्भात विशेष प्राधिकार दिलेल्या प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्याने, या भागान्वये शिक्षापात्र अपराधाबद्दल दोषी ठरलेल्या कोणत्याही व्यक्तीला पाच हजार रुपयांहून अधिक दंडाची शिक्षा फर्मावणे, हे विधिसंमत असेल :]

[4][परंतु असेही की, कोणताही वितरक किंवा प्रदर्शक किंवा एखाद्या चित्रपटगृहाचा मालक अथवा कर्मचारी हा, या भागान्वये ज्या चित्रपटाला "यूए" प्रमाणपत्र देण्यात आलेले असेल त्यावर इशाऱ्याचे पृष्ठांकन करण्याच्या कोणत्याही शर्तीचे उल्लंघन झाल्याबद्दल शिक्षेस पात्र नाही.]

(२) एखाद्या फिल्मच्या संबंधात या कलमान्वये केलेल्या आणखी शिक्षापात्र अपराधाकरिता एखाद्या व्यक्तीस सिद्धदोषी केले गेले तर, सिद्धदोषी ठरवणाऱ्या न्यायालयाला असा निदेश देता येईल की, ती फिल्म सरकारमध्ये समपहृत करावी.

(३) ज्या फिल्मच्या प्रदर्शनाबाबत "ए" प्रमाणपत्र, [4][किंवा "एस" प्रमाणपत्र किंवा "यूए" प्रमाणपत्र] देण्यात आलेले असेल अशी फिल्म, आपल्या आई-वडिलांबरोबर किंवा पालकांबरोबर येणाऱ्या, तीन वर्षांहून कमी वयाच्या मुलासमोर प्रदर्शित करणे, हा, या कलमाच्या अर्थान्तर्गत अपराध असल्याचे मानण्यात येणार नाही.

---

१. १९८१ च्या अधिनियम क्रमांक ४९, कलम ११ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (१ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

२. १९८४ चा अधिनियम क्रमांक ५६, कलम ३ अन्वये विवक्षित शब्दांऐवजी दाखल केले (२७ ऑगस्ट, १९८४ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ३ (ग) अन्वये हा मजकूर मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला (२७ ऑगस्ट, १९८४ रोजी व तेव्हापासून).

४. १९८१ चा अधिनियम क्रमांक ४९, कलम ११ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (१ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

[1][ जप्त करण्याचा अधिकार. ७-क. (१) जेव्हा, या अधिनियमान्वये प्रमाणपत्र देण्यात न आलेला एखादा चित्रपट प्रदर्शित करण्यात येईल, किंवा फक्त प्रौढांसाठी निर्बंधित जाहीर प्रदर्शनासाठी योग्य म्हणून प्रमाणित केलेला एखादा चित्रपट प्रौढ नसलेल्या एखाद्या व्यक्तीसाठी प्रदर्शित करण्यात येईल, किंवा एखादा चित्रपट, या अधिनियमातील अन्य कोणत्याही उपबंधाचे किंवा केंद्र सरकार, [2][न्यायाधिकरण] किंवा मंडळ यांनी त्यांना प्रदान करण्यात आलेल्या एखाद्या अधिकाराचा वापर करून केलेल्या एखाद्या आदेशाचे उल्लंघन करून प्रदर्शित करण्यात येईल, तेव्हा, कोणताही पोलीस अधिकारी,

[3]* * * ज्या ठिकाणी तो चित्रपट प्रदर्शित करण्यात आला आहे किंवा प्रदर्शित करण्यात येत आहे किंवा प्रदर्शित करण्याचा संभव आहे, असे त्यास वाटण्यास सबळ कारण असेल, अशा ठिकाणी प्रवेश करील, झडती घेईल व तो चित्रपट ताब्यात घेईल.

(२) या अधिनियमान्वये घेतलेल्या सर्व झडत्या त्या [4][ फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २)] याच्या झडतीसंबंधीच्या उपबंधांना अनुसरून घेण्यात येतील.]

मंडळाकडून अधिकारांचे प्रत्यायोजन. ७-ख. [5][ (१) ] केंद्र सरकार, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, असा निदेश देऊ शकेल की, या अधिनियमान्वये मंडळाकडून वापरण्यायोग्य असलेला कोणताही अधिकार, प्राधिकार किंवा अधिकारिता ही,

[6][या भागान्वये एखाद्या फिल्मचे प्रमाणीकरण करण्यासंबंधात] आणि आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील, अशा काही शर्ती असल्यास, त्या शर्तींच्या अधीनतेने, मंडळाच्या अध्यक्षाकडून किंवा अन्य कोणत्याही सदस्याकडून वापरण्यायोग्य असतील, आणि अध्यक्षाकडून किंवा आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या अन्य सदस्याकडून करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही ही, मंडळाकडून करण्यात आलेली गोष्ट किंवा कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

[7][ (२) केंद्र सरकार, आदेशाद्वारे व विहित करण्यात येतील अशा शर्ती व निर्बंधांच्या अधीन राहून, प्रादेशिक अधिकाऱ्यांना, तात्पुरते (कच्चे) प्रमाणपत्र देण्याचे प्राधिकार देऊ शकेल.]

परीक्षणासाठी फिल्म प्रदर्शन करण्याचा निदेश देण्याचा अधिकार. ७-ग. केंद्र सरकार, [8][न्यायाधिकरण] किंवा मंडळ त्याच्याकडून या अधिनियमान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांपैकी कोणत्याही अधिकाराचा वापर करण्याच्या प्रयोजनार्थ, कोणताही चित्रपट त्याच्यासमोर, किंवा, त्याने त्याबाबतीत विनिर्दिष्ट केलेल्या [9][ कोणत्याही व्यक्तीसमोर किंवा प्राधिकरणासमोर] प्रदर्शित करण्यास भाग पाडू शकेल.

रिक्त पदांमुळे कार्यवाही विधिअग्राह्य न ठरणे. ७-घ. [10][न्यायाधिकरणाची], मंडळाची किंवा कोणत्याही सल्लागार पॅनलची कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही, केवळ ते [10][न्यायाधिकरण], मंडळ किंवा यथास्थिति, सल्लागार पॅनल, यात रिक्त पद आहे, किंवा त्यांच्या घटनेत दोष आहे, याच कारणावरून विधिअग्राह्य असल्याचे मानण्यात येणार नाही.

---

१. १९५९ चा अधिनियम क्रमांक ३, कलम ५ अन्वये समाविष्ट करण्यात आले.

२. १९८१ चा अधिनियम क्रमांक ४९, कलम १२ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (१ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम १२ अन्वये विवक्षित शब्द वगळण्यात आले (१ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम १२ अन्वये हा मजकूर, "फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८" या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला (१ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाच्या कलम १३ अन्वये "पोट-कलम (१)" असा नव्याने क्रमांक देण्यात आला (१ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

६. वरील अधिनियमाच्या कलम १३ अन्वये हा मजकूर, "अशा बाबींसंबंधात", या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला (१ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

७. वरील अधिनियमाच्या कलम १३ द्वारे हे पोट-कलम दाखल करण्यात आले (१ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

८. वरील अधिनियमाच्या कलम १४ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला (१ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

९. वरील अधिनियमाच्या कलम १४ अन्वये हा मजकूर, "कोणत्याही व्यक्तीसमोर" या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला (१ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

१०. वरील अधिनियमाच्या कलम १५ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (१ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

**मंडळाचे व सल्लागार पॅनलचे सदस्य हे लोकसेवक असणे.**

७-ङ. [1][न्यायाधिकरणाचे], मंडळाचे व एखाद्या सल्लागार पॅनलचे सर्व सदस्य हे, जेव्हा ते या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाला अनुलक्षून कृती करीत असतील किंवा त्यांनी अशी कृती करणे अभिप्रेत असेल, तेव्हा भारतीय दंड संहिता (१८६० चा ४५) याच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोक-सेवक असल्याचे मानण्यात येईल.

**कायदेशीर कार्यवाहीस रोध.**

७-च. या अधिनियमान्वये सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचा हेतू असलेल्या कोणत्याही कृती संबंधात, [2][केंद्र सरकार, न्यायाधिकरण, मंडळ], सल्लागार पॅनल यांच्याविरुद्ध किंवा [3][केंद्र सरकार, न्यायाधिकरण, मंडळ किंवा,] यथास्थिति, सल्लागार पॅनल यांचा कोणताही अधिकारी किंवा सदस्य यांच्या-विरुद्ध कोणताही दावा किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही केली जाणार नाही.]

**नियम करण्याचा अधिकार.**

८. (१) केंद्र सरकारला, या भागाचे उपबंध अंमलात आणण्याच्या प्रयोजनार्थ, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

[4][(२) विशेषकरून आणि पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाध न येता, या कलमाखाली करण्यात आलेल्या नियमांद्वारे पुढील बाबींसाठी तरतूद करता येईल :—

(क) मंडळाच्या सदस्यांना देय असलेले भत्ते किंवा फी ;

(ख) मंडळाच्या सदस्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती ;

(ग) प्रमाणपत्रासाठी मंडळाकडे अर्ज करण्याची रीत व मंडळाने चित्रपटाचे परीक्षण करण्याची रीत व त्याकरिता आकारावयाची फी ;

(घ) चित्रपटाच्या परीक्षणात प्रादेशिक अधिकाऱ्यांचा सहभाग, तात्पुरती प्रमाणपत्रे देण्यासाठी कलम ७-ख अनुसार प्रादेशिक अधिकाऱ्यांना ज्याच्या अधीन राहून प्राधिकृत केले जाईल, त्या अटी व शर्ती आणि अशा प्रमाणपत्रांच्या विधिग्राह्यतेचा कालावधी ;

(ङ) कोणत्याही चित्रपटासंबंधात मंडळाने एखाद्या सल्लागार पॅनलशी विचारविनिमय करण्याची रीत ;

(च) सल्लागार पॅनलच्या सदस्यांना देय असणारे भत्ते किंवा फी ;

(छ) चित्रपटाचे चिन्हांकन करणे ;

(ज) न्यायाधिकरणाच्या सदस्यांना देय असणारे भत्ते किंवा फी ;

(झ) न्यायाधिकरणाच्या सचिवाचे व इतर कर्मचाऱ्यांचे अधिकार व कर्तव्ये ;

(ञ) न्यायाधिकरणाच्या अध्यक्षांच्या व सदस्यांच्या, आणि सचिवाच्या व इतर कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या इतर अटी व शर्ती ;

(ट) अपीलकर्त्याने एखाद्या अपिलासंबंधात न्यायाधिकरणाला द्यावयाची फी ;

(ठ) ज्या शर्तींच्या अधीन राहून कोणतेही प्रमाणपत्र दिले जाऊ शकते त्या शर्ती (ज्यात सर्व-साधारणतः फिल्मच्या लांबी संबंधीच्या शर्ती किंवा विशेषतः एखाद्या वर्गाच्या फिल्मसंबंधीच्या शर्ती यांचा समावेश आहे) किंवा ज्या परिस्थितीत कोणतेही प्रमाणपत्र नाकारले जाऊ शकते ती परिस्थिती ;

(ड) विहित करणे आवश्यक असलेली किंवा विहित करण्यात येईल अशी अन्य कोणतीही बाब.]

[5][(३) या भागान्वये केंद्र सरकारने केलेला प्रत्येक नियम हा, तो करण्यात आल्यानंतर, तात्काळ संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, एका सत्राने किंवा दोन वा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता ते सत्रासीन असताना, मांडण्यात येईल आणि उपरोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या लगतनंतरचे सत्र समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात फेरफार करण्याविषयी दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले, किंवा तो नियम करण्यात येऊ नये याविषयी दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा फेरफार केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा, यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही ; तथापि, असे फेरफार केल्यामुळे किंवा शून्यीकरणामुळे, त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.]

---

१. १९८१ चा अधिनियम क्रमांक ४९, कलम १६ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (१ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम १७ अन्वये हा मजकूर "केंद्र सरकार, मंडळ" या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला (१ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम १७ अन्वये हा मजकूर "केंद्र सरकार, मंडळ किंवा" मजकुराऐवजी दाखल करण्यात आला (१ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम १८ अन्वये, मूळ पोट-कलम (२) ऐवजी हे दाखल करण्यात आले (१ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

५. १९७३ चा अधिनियम क्रमांक २५, कलम ४ अन्वये हे पोटकलम पूर्वीच्या पोट-कलमाऐवजी दाखल करण्यात आले.

**सूट देण्याचा अधिकार.** ९. केंद्र सरकार, लेखी आदेशाद्वारे, ते लादील अशा काही शर्ती व निर्बंध असल्यास, अशा शर्ती व निर्बंधांच्या अधीन राहून, कोणत्याही चित्रपटाच्या किंवा चित्रपटाच्या कोणत्याही वर्गाच्या प्रदर्शनास, या भागाच्या कोणत्याही उपबंधांपासून किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांच्या कोणत्याही उपबंधांपासून सूट[1] देऊ शकेल.

## भाग तीन

## चलचित्राच्या प्रदर्शनाचे विनियमन

**चलचित्राच्या प्रदर्शनासाठी लायसन देणे.** १०. या भागात अन्यथा उपबंधित करण्यात आले असेल त्याखेरीज, कोणतीही व्यक्ती, या भागान्वये लायसन देण्यात आलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्यत्र किंवा अशा लायसनद्वारे लादण्यात आलेल्या कोणत्याही शर्तीचे व निर्बंधाचे अनुपालन केल्याशिवाय, अन्यथा कोणत्याही चलचित्राचे प्रदर्शन करणार नाही.

**लायसन देणारा प्राधिकारी.** ११. या भागान्वये लायसन मंजूर करण्याचा अधिकार असणारा प्राधिकारी, (यात यापुढे ज्याचा लायसन देणारे प्राधिकारी असा निर्देश करण्यात आला आहे) म्हणजे जिल्हा दंडाधिकारी असेल :

परंतु, राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, संपूर्ण [2][संघराज्य क्षेत्र] किंवा त्याचा कोणताही भाग याकरिता, अधिसूचनेत ते विनिर्दिष्ट करील असे अन्य प्राधिकरण या भागाच्या प्रयोजनार्थ लायसन देणारा प्राधिकारी म्हणून घटित करू शकेल.

**लायसन देणाऱ्या प्राधिकरणाच्या अधिकारांवरील निर्बंध.** १२. (१) लायसन देणाऱ्या प्राधिकरणाची पुढील बाबतीत खात्री पटल्याशिवाय ते, या भागान्वये लायसन मंजूर करणार नाही:—

(क) या भागान्वये तयार करण्यात आलेल्या नियमांचे पुरेशा प्रमाणात अनुपालन करण्यात आलेले आहे, आणि

(ख) ज्याच्याबाबतीत लायसन द्यावयाचे आहे अशा जागेमध्ये प्रदर्शनासाठी उपस्थित राहणाऱ्या व्यक्तींच्या सुरक्षेसाठी, त्या जागेमध्ये पुरेशी खबरदारी घेण्यात आलेली आहे.

(२) या कलमाच्या पूर्ववर्ती उपबंधांना अधीन राहून व राज्य शासनाच्या नियंत्रणाधीन, लायसन देणारे प्राधिकरण, त्यास योग्य वाटतील अशा व्यक्तींना आणि ते ठरवील अशा अटी व शर्तींवर व तशा निर्बंधांच्या अधीन राहून या भागान्वये लायसन मंजूर करू शकेल.

(३) या भागान्वये लायसन मंजूर करण्यास नकार देणाऱ्या, लायसन प्राधिकरणाच्या निर्णयामुळे व्यथित झालेली कोणतीही व्यक्ती विहित करण्यात येईल एवढ्या कालावधीत, राज्य शासनाकडे किंवा राज्य शासन यासंदर्भात विनिर्दिष्ट करील अशा अधिकाऱ्याकडे अपील करू शकेल आणि राज्य शासन, किंवा यथास्थिति, तो अधिकारी त्याप्रकरणी त्याला योग्य वाटेल असा आदेश देऊ शकेल.

(४) केंद्र सरकार, वेळोवेळी लायसनधारकांना सर्वसाधारणपणे किंवा एखाद्या लायसनधारकाला विशेषतः एखाद्या चित्रपटाच्या किंवा चित्रपटांच्या वर्गाच्या प्रदर्शनाबाबत विनियमन करण्याच्या प्रयोजनार्थ निदेश देऊ शकेल, ज्यायोगे, वैज्ञानिक चित्रपट, शैक्षणिक प्रयोजनाचा हेतू असलेले चित्रपट, बातम्या व चालू घडामोडींशी संबंधित चित्रपट, माहितीपट किंवा देशीय चित्रपट, यांना प्रदर्शनासाठी पुरेशी संधी मिळू शकेल, आणि जेव्हा असे निदेश देण्यात येतील तेव्हा ते निदेश हे, ज्यांच्या अधीन राहून लायसन देण्यात आले आहे त्यातील अशा जादा अटी व निर्बंध असल्याचे मानण्यात येतील.

**विवक्षित प्रकरणी चित्रपटांचे प्रदर्शन निलंबित करण्याचा केंद्र सरकारचा किंवा स्थानिक प्राधिकरणाचा अधिकार.** १३. (१) [3][संपूर्ण संघराज्य क्षेत्र किंवा त्याचा कोणताही भाग] याच्या संबंधात, यथास्थिति नायब राज्यपाल किंवा मुख्य आयुक्त आणि आपआपल्या अधिकारितेत येणाऱ्या जिल्ह्यांच्या बाबतीत त्या त्या जिल्ह्याचे दंडाधिकारी, यांचे जर असे मत असेल की, जाहीर प्रदर्शन करण्यात आलेला एखादा चित्रपट हा शांततेचा भंग करण्यास कारणीभूत ठरण्याचा संभव आहे, तर ते आदेशाद्वारे, त्या चित्रपटाचे प्रदर्शन निलंबित करू शकतील आणि अशा निलंबनाच्या कालावधीत तो चित्रपट त्या राज्यात, भागात, किंवा यथास्थिति जिल्ह्यात अप्रमाणित चित्रपट असल्याचे मानण्यात येईल.

(२) मुख्य आयुक्त, किंवा यथास्थिति, जिल्हा दंडाधिकारी हे जेव्हा पोटकलम (१) अन्वये आदेश देतील, तेव्हा तो आदेश काढणारी व्यक्ती त्याची एक प्रत, त्या आदेशाच्या कारणांच्या विवरणासह तावडतोब, केंद्र सरकारकडे पाठवील आणि केंद्र सरकार एकतर तो आदेश कायम करील किंवा फेटाळून लावील.

---

१. अशा सर्वसाधारण सूटीसाठी **भारताचे राजपत्र** (इंग्रजी) १९५२, भाग दोन, अनुभाग ३, इं. पृष्ठ १५७८-१५८१ पहावे.

२. १९६० चा अधिनियम क्रमांक ५८, कलम ३ व अनुसूची दोन अन्वये "भाग क राज्ये" या मजकुराऐवजी घातला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ३ व अनुसूची दोन अन्वये "संपूर्ण भाग क राज्ये किंवा त्याचा कोणताही भाग" या मजकुराऐवजी घातले.

(३) या कलमान्वये दिलेला आदेश हा, त्या आदेशाच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या कालावधी-करिता अंमलात राहील परंतु, केंद्र सरकारचे जर असे मत असेल की, तो आदेश अंमलात असणे चालू राहावे तर, ते असा निदेश देऊ शकेल की, निलंबनाचा कालावधी त्यास योग्य वाटेल तेवढ्या कालावधीने पुढे वाढवण्यात यावा.

१४. या भागाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या उपबंधांचे उल्लंघन करून किंवा ज्यांच्या आधारे किंवा अधीन राहून एखादे लायसन देण्यात आले असेल त्या शर्तींचे व निर्बंधांचे उल्लंघन करून जर एखाद्या चलचित्राच्या मालकाने किंवा त्याचा प्रभार असणाऱ्या व्यक्तीने त्याचा वापर केला किंवा वापर करण्यास परवानगी दिली किंवा एखाद्या जागेचा मालक किंवा उपभोक्ता याने त्या जागेचा वापर करण्यास परवानगी दिली तर, त्यास एक हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या दंडाची आणि अपराध चालू राहिल्यास त्या प्रकरणी, जेवढ्या कालावधीत अपराध चालू राहील, त्यातील प्रत्येक दिवसा-करिता शंभर रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या आणखी दंडाची शिक्षा होऊ शकेल. या भागाच्या उल्लंघनाबद्दल शास्ती.

१५. जेव्हा लायसनधारकास, कलम ७ किंवा कलम १४ अन्वये अपराधाबद्दल दोषी ठरवण्यात आले असेल तेव्हा लायसन देणारे प्राधिकरण ते लायसन रद्द करू शकेल. लायसन रद्द करणे.

१६. [1][(१)] केंद्र सरकार शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे पुढील गोष्टींसाठी नियम करू शकेल :— नियम करण्याचा अधिकार.

(क) या भागान्वये लायसन, ज्या अटी, शर्ती व निर्बंधांच्या अधीन राहून दिले जाईल त्या अटी, शर्ती व निर्बंध विहित करणे,

(ख) सार्वजनिक सुरक्षिततेची सुनिश्चिति करण्यासाठी म्हणून चलचित्रांच्या प्रदर्शनाचे विनियमन करण्याची तरतूद करणे,

(ग) कलम १२ च्या पोटकलम (३) अन्वये करावयाचे अपील, ते किती मुदतीत आणि कोणत्या शर्तींच्या अधीन राहून करावयाचे, ते विहित करणे.

[2][(२) या भागान्वये केंद्र सरकारने केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यावर शक्य तेवढ्या लवकर, संसदेच्या दोन्ही सभागृहांसमोर, ते एका सत्राने बनलेल्या किंवा दोन वा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता ते सत्रासीन असताना ठेवण्यात येईल, आणि उपरोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या लगतनंतरचे सत्र समाप्त होण्यापूर्वी जर, त्या नियमात फेरफार करण्याबद्दल दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले किंवा तो नियम करू नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, तो नियम त्यानंतर अशा फेरफार केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल, किंवा यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही ; तथापि, असे फेरफार केल्यामुळे किंवा शून्यीकरणामुळे, त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.]

१७. केंद्र सरकार, लेखी आदेशाद्वारे आणि ते लादील अशा अटी व निर्बंधांच्या अधीन राहून कोणत्याही चलचित्रांच्या प्रदर्शनास किंवा चलचित्रांच्या कोणत्याही वर्गाच्या प्रदर्शनास या भागाच्या किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांच्या कोणत्याही उपबंधापासून सूट [3]देऊ शकेल. सूट देण्याचा अधिकार.

## भाग चार

## निरसन

१८. चलचित्र अधिनियम, १९१८ (१९१८ चा २) हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे : निरसन.

परंतु, भाग क राज्ये व भाग ख राज्ये यांच्या बाबतीत हे निरसन उक्त अधिनियम जेथवर चल-चित्रांना प्रदर्शनासाठी मंजुरी देण्याशी संबंधित आहे, तेथवरच लागू होईल.

---

१. १९८१ चा अधिनियम क्रमांक ४९, कलम १९ अन्वये या कलमास पोटकलम (१) असा नव्याने क्रमांक देण्यात आला (१ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम १९ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (१ जून, १९८३ रोजी व तेव्हापासून).

३. अशा सर्वसाधारण सुटीसाठी, भारताचे राजपत्र, १९५४, भाग दोन, अनुभाग ३, इं. पृ. २४० आणि भारताचे राजपत्र, १९५५, भाग दोन, अनुभाग ३, इं. पृ. ३१० पहावे.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई